महाराष्ट्र शासन

क्रमांक : गौखनि ३९/१०१५/प्र.क्र.५२९/ख

महसूल व वन विभाग
मादाम कामा मार्ग,
हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय, मुंबई - ३२
दिनांक : १३ सप्टेंबर, २०१९

विषय : गौण खनिज-औरंगाबाद
मौजे शिवपूर ता. गंगापूर या वाळूगटाची रक्कम परत करणेबाबत.
-श्री. रावसाहेब मोहन टेके.

शासन ज्ञापन:

जिल्हाधिकारी, औरंगाबाद यांना उपरोक्त विषयाबाबतचे पत्र क्र.जा.क्र.२०१९/मशाका ३/गौख/कावि-२५, दि.१२/०३/२०१९ व जा.क्र.२०१९/मशाका-२/ता.गंगापूर वाळूलिलाव रक्कम परतावा/कावि-२८, दि.१६/०३/२०१९ रोजीच्या पत्रास अनुलक्षून असे कळविण्याचे मला निदेश आहेत की, सन २०१२-१३ साठी मौजे शिवपूर ता. गंगापूर येथील वाळूगट श्री. रावसाहेब मोहन टेके यांना रू.६,१७,१७७/- इतक्या सर्वोच्च बोलीने मंजूर करण्यात आला होता. सदर वाळूगटाचा लिलाव दि.५/०१/२०१३ रोजी करण्यात आला. त्यानंतर लिलावधारकाने लिलावाची १/४ रक्कम दि.५/०१/२०१३ रोजी व लिलावाची उर्वरीत ३/४ रक्कम दि.१९/०१/२०१३ रोजी शासनजमा केली. परंतु लिलावधारकास वाळू उत्खननाचे आदेश निर्गमित करण्यात आले नाही. लिलावधारकाने दि.१६/०८/२०१३ व दि.२६/०५/२०१४ रोजीच्या अर्जावर कार्यवाही न झाल्यामुळे मा. मुंबई उच्च न्यायालय, खंडपीठ औरंगाबाद येथे रिट पिटीशन क्र.३५७२/२०१४ दाखल करून दि.१८/०६/२०१४ रोजीच्या आदेशान्वये सहा महिन्यात निर्णय घेण्याचे आदेश पारीत करण्यात आले. परंतु मा. न्यायालयाच्या सदर आदेशानुसार परतावा न मिळाल्याने अर्जदार यांनी मा. मुंबई उच्च न्यायालय, खंडपीठ औरंगाबाद येथे अवमान याचिका क्र.CP/८३९/२०१८ दाखल केली आहे.

दरम्यान, लिलावधारकाने मा. मंत्री (महसूल) यांच्याकडे अपील केले असता, सदर अपिलावर सुनावणी घेवून दि.०४/०५/२०१८ रोजीच्या आदेशान्वये अर्जदार यांचा अर्ज न्यायिकत्व अधिकारात निर्णित करण्याजोगा नसल्याने कामकाजातून काढून टाकण्यात येत असला तरीही विभागाने निकालपत्रातील निष्कर्षामधील विवेचनानुसार कार्यवाही करण्याचे आदेश पारीत केले. मा. मंत्री (महसूल) यांच्या उक्त आदेशाच्या अनुषंगाने श्री. टेके यांना वाळूगटाचे आदेश निर्गमित करण्यात आले नसल्यामुळे त्यांनी शासनजमा केलेली लिलावाची रक्कम रू. ६,१७,१७७/- परत करण्याबाबचा शासनाने निर्णय घेतला आहे.

२. सबब, श्री. रावसाहेब मोहन टेके यांना एकूण रक्कम रु. ६,१७,१७७/- (रुपये सहा लाख सतरा हजार एकशे सत्याहत्तर फक्त) इतकी रक्कम, त्यांनी लिलावाची संपूर्ण रक्कम प्रत्यक्षात शासनाकडे जमा केल्याची, यापूर्वी ही रक्कम अदा केलेली नाही याची खातरजमा करुन घेण्याच्या अटीवर अदा करण्यास या शासन ज्ञापनाद्वारे शासनाची मान्यता देण्यात येत आहे.

३. याबाबीवर होणारा खर्च सन २०१९-२० यावर्षाकरीता लेखाशिर्ष "०८५३ - अलोहयुक्त खाणी व धातुशास्त्रीय उद्योग "१०२ - खनिजबाबत सवलत फी व स्वामित्वधन, ९००, अलोहयुक्त खाणकाम व धातुशास्त्रीय उद्योग - वजा परतावे (००) (०१) वजा परतावे (०८५३ ००८६) खाली वजा परतावे देण्याकरीता करण्यात आलेल्या उपलब्ध अंदाजपत्रकीय तरतूदीमधून खर्ची टाकून भागविण्यात यावा.

४. सदर शासन ज्ञापन वित्त विभागाच्या क्र.विअप्र-२०१९/प्र.क्र.२०/२०१९/विनियम, दि.८/०८/२०१९ रोजीच्या शासन निर्णयान्वये वित्तीय अधिकार नियम पुस्तिका,१९७८, भाग-२ नुसार महसूल व वन विभागास प्रदान करण्यात आलेल्या वित्तीय शक्तीनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन ज्ञापन महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संकेतांक २०१९०९१३१५४२१०५०१९ असा आहे. हे शासन ज्ञापन डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

GAJANAN DHARMA DABHILKAR

Digitally signed by GAJANAN DHARMA DABHILKAR
DN: c=IN, st=Maharashtra,
2.5.4.20=c4f6398a3105d0cebbc1a00f25241de3304637656082108e1227c13033d76bfe, postalCode=400032,
street=MANTRALAYA,MUMBAI,
serialNumber=69c2bd0a657d8ab9b87341301d9ac56408774af7b6416010e1d362583c71ffd6, ou=NA, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, cn=GAJANAN DHARMA DABHILKAR
Date: 2019.09.13 16:06:28 +05'30'

(गजानन दाभिळकर)
कार्यासन अधिकारी
महसूल व वन विभाग

प्रति,

जिल्हाधिकारी औरंगाबाद, औरंगाबाद.

प्रत:

१) विभागीय आयुक्त, औरंगाबाद विभाग, औरंगाबाद.
२) प्रधान महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-२, नागपूर.
३) प्रधान महालेखापाल (लेखापरीक्षा)-२, नागपूर.
४) जिल्हा कोषागार औरंगाबाद, औरंगाबाद.
५) वित्त विभाग, (व्यय-९,अर्थसंकल्प -३, ६ व १४ कार्यासने) हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग, मंत्रालय, मुंबई -३२.
६) कार्यासन अधिकारी (ब-१ कार्यासन) महसूल व वन विभाग, हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग, मंत्रालय, मुंबई -३२.
७) निवडनस्ती ख कार्यासन, महसूल व वन विभाग, हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग, मंत्रालय, मुंबई -३२.